मा.राज्यपालांचे सचिवालयातंर्गत येणाऱ्या सचिव कार्यालयातील गट-ब (राजपत्रित) अधिकारी यांचे वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवा पुनर्विलोकन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.पुनर्वि-२०२५/प्र.क्र.११८/राजभ,**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक:- १३ ऑक्टोबर, २०२६.**

**संदर्भ :-** १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एलपीएल-२०१७/प्र.क्र.२१/का.पंधरा, दि.१०/०६/२०१९
२) मा.राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन)यांचे पत्र क्र.राजभ/रास-रापप्र/आस्था-२०२५/५०/५५ पुनर्वि /प्र.क्र.८०/१९८८, दि.११/११/२०२५
३) मा.राज्यपालांचे अवर सचिव (प्रशासन)यांचे पत्र क्र.लोकभ/रास/प्रशासन/ ८४५/२०२६ , दि.०८/०६/२०२६
४) सामान्य प्रशासन विभाग, शासना निर्णय क्र.पुनर्वि-२०२५/प्र.क्र.११८/राजभ, दि.१४/०७/२०२६

**प्रस्तावना:**

सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र.१ येथील दि.१०/०६/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर करावयाच्या सेवेच्या पुनर्विलोकनाबाबतच्या मार्गदर्शक सूचना विहित करण्यात आल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाने विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार साप्रवि/राजभ कार्यासनाच्या अधिपत्याखालील मा.राज्यपालांचे सचिव कार्यालय व राज्यपालांचे परिवार प्रबंधक कार्यालयातील गट-अ (राजपत्रित) व गट-ब (राजपत्रित) अधिकारी यांच्या वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवेचे पुनर्विलोकन करण्यासाठी पुनर्विलोकन समिती तसेच अभिवेदन समिती संदर्भ क्र.४ येथील दि.१४/०७/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेली आहे.

**शासन निर्णय :-**

मा.राज्यपालांचे सचिवालयातंर्गत येणाऱ्या सचिव कार्यालयातील अधिकारी (गट अ-राजपत्रित आणि गट ब -राजपत्रित) यांचे वयाच्या ५०/५५ वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवेचे पुनर्विलोकन करण्याबाबत संदर्भ क्र.२ व ३ येथील दि.११/११/२०२५ व दि.०८/०६/२०२६ रोजीच्या पत्रांन्वये सादर केलेला प्रस्ताव सचिव तथा मु.रा.अ यांच्या अध्यक्षतेखालील पुनर्विलोकन समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. समितीने सदर अधिकाऱ्यांच्या सेवेचे मुल्यमापन करुन केलेल्या शिफारशीस सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार मा.राज्यपालांचे सचिवालयातंर्गत येणाऱ्या सचिव कार्यालयातील खालील अधिकाऱ्यांची सेवा त्यांच्या वयाच्या ५०/५५

वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षे अर्हताकारी सेवा यापैकी जे अगोदर घडेल त्यानंतर चालू ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | सेवेत चालू ठेवण्यासाठी पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.जयेश अशोक ठाकुर | कक्ष अधिकारी (गट-ब राजपत्रित) | पात्र |
| २ | श्रीमती मनिषा चिंतामण हिरे | लघुलेखक (निवडश्रेणी) (गट-ब राजपत्रित) | पात्र |

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१३१७१३०८२६०७ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RANSING ANANDRAO DERE
Date: 2026.10.13 17:14:18 +05'30'

( रणसिंग डेरे )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई

**प्रत माहितीसाठी अग्रेषित,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
३) सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४) सहसचिव (साप्रवि/सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५) उपसचिव (कार्या.लोकआ (१५), सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई-३२
६) उप सचिव (कार्या.राजभ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
७) अवर सचिव (कार्या.राजभ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) मा. निवडनस्ती (राजभ)